क्रमांक .2314/2018
धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य
मुंबई यांचे कार्यालय
धर्मादाय आयुक्त भवन, ३ रा मजला
८३, डॉ. ॲनी बेसंट रोड
वरळी, मुंबई ४०० ०१८

19 APR 2018

कार्यालयीन परिपत्रक क्र. ५३६, दिनांक. १९.०४.२०१८

या कार्यालयाच्या असे निदर्शनास आले आहे की, राज्यातील काही धर्मादाय रुग्णालयांच्या आवारात(Premises) औषधींचे दुकान हे आउटसोर्स केलेले असते अथवा त्यांच्या आवारात ते भाड्यावर/ लीज वर दिलेले असते. परिणामतः मा. उच्च न्यायालयाच्या योजनेखालील निर्धन व दुर्बल घटकातील रुग्णांना अशा धर्मादाय रुग्णालयात योजनेनुसार मोफत व सवलतीच्या दराने वैद्यकीय उपचार मिळतात; परंतु, औषधे व इतर कन्झ्युमेबल्स, इम्प्लांट्स यांची त्यांना बाहेरून खरेदी करावी लागते, ती त्यांना परवडणारी नसते.

वास्तविक रुग्णालयांचे औषधींचे दुकान हे जरी आउटसोर्स केलेले असले अथवा भाड्याने/ लीझवर दिलेले असले तरी, ते रुग्णालयांच्या आवारात असते म्हणजेच ती सुविधा तेथे उपलब्ध असते. अशा वेळेस गरीब रुग्णांना सदर सुविधांकरीता पैसे द्यावे लागतात, हे योजनेतील तरतुदींशी सुसंगत नाही.

तरी, सदर परिपत्रकाद्वारे, राज्यातील सर्व धर्मादाय रुग्णालयांना असे निर्देश देण्यात येतात की, ज्या धर्मादाय रुग्णालयांच्या आवारात (Premises) औषधींचे दुकान आहे, व ते त्यांनी आउटसोर्स केलेले आहे अथवा भाड्यावर/लीज वर दिलेले आहे, त्या धर्मादाय रुग्णालयाने निर्धन व दुर्बल घटकातील रुग्णांकरीता आवश्यक असणारी औषधे, इम्प्लांट्स व कन्झ्युमेबल्स यांची आकारणी योजनेतील तरतुदींप्रमाणे त्यांचे देयकांत करून, निर्धन रुग्णांच्या निधीतून सदर देयके तरतुदींनुसार खर्ची घालावीत.

सर्व अधिनस्त जिल्हा कार्यालयांनी त्यांचे जिल्ह्यातील सर्व धर्मादाय रुग्णालयांना सदर परिपत्रकाची प्रत पाठवावी व कार्यवाहीचा अहवाल मुख्यालयास सादर करावा.

१९.४.१८

(शि.ग.डिगे.)
धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रतः

**धर्मादाय सह आयुक्त,**
बृहन्मुंबई/पुणे/कोल्हापूर/नाशिक/औरंगाबाद/लातूर/नागपूर/अमरावती.

**धर्मादाय उप आयुक्त,**
ठाणे/ अहमदनगर/ सांगली/ सोलापूर/जळगांव/नांदेड/अकोला/बीड.

**सहायक धर्मादाय आयुक्त,**
रायगड/सातारा/धुळे/नंदूरबार/रत्नागिरी/सिंधुदुर्ग/जालना/परभणी/
हिंगोली/उस्मानाबाद/वर्धा/भंडारा/ चंद्रपूर/गडचिरोली/गोंदिया/वाशिम/बुलढाणा/यवतमाळ.

प्रत :
१. कार्यालयीन आदेश धारीणी.
२.रुग्णालय शाखा (मुख्यालय )
३. संगणक शाखा (मुख्यालय )

C:\Users\hp\Desktop\Bhupendra\letters.odt14